पंचायतीचे उपबंध [ अनुसूचित क्षेत्रात लागू करणे] अधिनियम, १९९६ ची अंमलबजावणी

---

अनुसूचित क्षेत्रामध्ये विकास प्रकल्पासाठी जमीन संपादन करण्यापूर्वी आणि अनुसूचित क्षेत्रातील अशा प्रकल्पामुळे बाधीत झालेल्या व्यक्तींची पुर्नवसाहत किंवा पुनर्वसन करण्यापूर्वी ग्राम सभेचा किंवा समुचित पातळीवरील पंचायतीचा सल्ला घेणे बाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : एलक्यूएन १०९७/प्र.क्र.८१२/अ-२.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १० डिसेंबर, १९९७

पंचायतीचे उपबंध [अनुसूचित क्षेत्रात लागू करणे] अधिनियम, १९९६ या उपबंध कलम ४[झ] खालील प्रमाणे आहे :-

"कलम ४ [झ] :- अनुसूचित क्षेत्रामध्ये विकास प्रकल्पासाठी जमीन संपादन करण्यापूर्वी आणि अनुसूचित क्षेत्रातील अशा प्रकल्पामुळे बाधीत झालेल्या व्यक्तीची पुर्नवसाहत किंवा पुनर्वसन करण्यापूर्वी ग्राम सभेचा किंवा समुचित पातळी वरील पंचायतीचा सल्ला घेण्यात येईल."

अनुसूचित क्षेत्रातील प्रकल्पाचे प्रत्यक्ष नियोजन व कार्यान्वयन याचे समन्वय राज्य पातळीवर साधण्यात येईल."

शासनाच्या किंवा अन्य विकास कामासाठी संपादित करण्यात येणा-या जमिनीच्या संपादन प्रकरणी उपरोक्त उपबंधातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्याच्या दृष्टीने उपरोक्त अधिनियमाची त्वरेने अंमल बजावणी करण्यासाठी खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत :-

परिपत्रक:-

अनुसूचित क्षेत्रात विकास प्रकल्पासाठी जमीन संपादनाबाबत भूसंपादन अधिनियम, १८९४ खालील कलम ४ ची अधिसूचना प्रसिध्द करण्यापूर्वी भूसंपादन अधिका-यांनी संबंधित ग्राम पंचायत/पंचायत/जिल्हा परिषद यांचा सल्ला लेखी पत्राद्वारे मागवावा.

[१] असा सल्ला मागितल्यापासून तो ग्रामसभा/पंचायत/जिल्हा परिषद यांनी तो १५ दिवसांत लेखी स्वरुपात द्यावा. जर असा सल्ला १५ दिवसांत लेखी स्वरुपात प्राप्त झाला नाही तर ग्रामसभा/पंचायत/जिल्हा परिषद यांनी सदर भूसंपादनास मान्यता दिली आहे, असे गृहीत धरण्यात यावे.

[२] ग्रामसभा/पंचायत/जिल्हा परिषद यांनी आपल्या सल्ल्याप्रमाणे सदर भूसंपादनास मान्यता दिली असेल तर भूसंपादन अधिका-याने नियमानुसार पुढील भूसंपादनाची कार्यवाही तत्काळ सुरु करावी, आणि

[३] जर ग्रामसभा/पंचायत/जिल्हा परिषद यांनी आपल्या सल्ल्यान्वये सदर भूसंपादनास मान्यता दिली नसेल तर ती बाब भूसंपादन अधिका-याने प्रकल्प राबविणा-या संस्थेच्या म्हणजेच भूसंपादक संस्थेच्या निदर्शनास लेखी स्वरुपात तत्काळ आणून त्यावर त्यांचे लेखी अभिप्राय घ्यावेत. जर संपादक संस्थेस ग्रामसभा/पंचायत/जिल्हा परिषद यांचा सल्ला मान्य नसेल आणि प्रकल्पासाठी भूसंपादनाची कार्यवाही आवश्यक असेल तर त्यांनी त्यांच्या प्रशासकिय विभागाची मान्यता घेवून तसे लेखी प्रमाणपत्र भूसंपादन अधिका-यास सादर करावे. असे प्रमाणपत्र भूसंपादक संस्थेने सादर केल्यानंतरच भूसंपादन अधिका-याने भूसंपादनाची पुढील कार्यवाही करावी.

२. अनुसूचित क्षेत्रातील विकास प्रकल्पासाठी करावयाच्या भूसंपादनाच्या संदर्भात उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ रमाकान्त अस्मर ]
शासनाचे उप सचिव,
महसूल व वन विभाग.